क्रमांक: एलईएन २६९८/प्र.क्र. १४२३/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ७/५/९७

विषय:- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे अंधेरी न.भू.क्र. २५५
मधील जमीन मिळण्याची विकास असोसिएटस
यांची मागणी -

ज्ञापन :-

वरील विषयाबाबतच्या जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या पत्र क्र. ०१/३ ब/सी-००३७, दिनांक १६/३/९२ व १६/११/९६ च्या संदर्भात त्यांना विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, अंधेरी येथील न.भू.क्र. ४५३ [ स.नं. ११२/६ ते १० ] या खाजगी जमिन धारकांनी जमिनीच्या पश्चिमेस असलेल्या न.भू.क्र. २५५ या चिंचोली पट्टीवजा शासकीय जमिनीची मागणी शासनाकडे केली होती. अर्जदाराची सदर मागणी शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, अंधेरी न.भू.क्र. २५५ या शासकीय जमिनीपैकी १५४.६ चौ.मी. जमीन लगतच्या न.भू.क्र. ४५३ या खाजगी जमिनीचे मालक विकास असोसिएटस [श्री. मदनलाल गुप्ता ] यांना महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीचे वितरण ] नियम १९७१ च्या कलम ३७ मधील तरतुदीनुसार जमिनीचा चालू बाजारभावावर आधारित/ तात्पुरती [ रु. १५,५००प्र.चौ.मी. ] कब्जेहक्काची रक्कम वसूल करुन पुढील अटी/शर्तींवर मंजूर करण्यात यावी.

१] नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाद्वारे ठरविले जाणारे अंतीम मुल्यांकन तात्पुरत्या मुल्यांकनाहून जास्त असल्यास फरकाची रक्कम विहीत व्याजासह भरणा करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी कळविल्यापासून अर्जदार एका महिन्याच्या आत एक रकमी भरणा करतील.

२] मुंबई विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक अर्जदाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मिळवावा.

३] जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा इतर अटी/शर्ती.

२. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या ठराव क्र. विअप्र १०९२/प्र.क्र. १४८/१५निमय दिनांक ३१/८/९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ म.मु. गद्दे ]

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

...दा कार्यालय,
...-९८
ws/331

Scanned by CamScanner

(533)


# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com


क्र. :-०१/३ब/सी-००३७

दिनांक :- ? /११/२००४.

**वाचले :-**

१) शासन, महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र.एलइएन-२६८८/प्रक्र.१४२३/ज-३, दिनांक ७/१/१९९७.

२) या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दिनांक १३/६/१९९७.

३) विकास असोसिएट्स यांची पत्रे दिनांक २/७/१९९७, दिनांक १४/७/१९९७ व दिनांक १४/१०/२००४.

**आदेश :-**

मे. विकास असोसिएट्स यानी त्यांच्या खाजगी मालकीच्या मौजे अंधेरी येथील नभूक्र.४५३ या जमीनीच्या लगत पश्चिमेस असलेल्या नभूक्र.२५५ या चिंचोळीपट्टीवजा शासकीय जमीनीपैकी क्षेत्र १५४.६चौ.मी. जमीनीची मागणी शासनाकडे केली होती. त्या अनुषंगाने शासनाने उद्देशिकेत अ.क्र.१ कडे नमूद केलेल्या ज्ञापनान्वये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम १९७१ च्या कलम ३७ मधील तरतुदीनुसार जमीनीच्या चालू बाजारभावावर आधारीत प्रती चौरस मीटरला रु.१५,५००/- या तात्पुरत्या दराने येणाऱ्या कब्जेहक्काच्या किंमतीवर उपरोक्त जमीन मे. विकास असोसिएट्स यांना मंजूर केली आहे.

शासनाने आकारलेल्या तात्पुरत्या किंमतीवर येणारी कब्जेहक्काची किंमत जास्त वाटल्याने मे. विकास असोसिएट्स यांनी त्यांच्या दिनांक २/७/१९९७ च्या पत्रान्वये जमीनीची किंमत कमी करावी म्हणून शासनाकडे विनंती केली होती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे शासनाने मंजूर केलेली चिंचोळीपट्टीवजा जमीन १५४.६चौ.मी. क्षेत्राची असून तीचा स्वतंत्रपणे शासनास अथवा इतर कोणासही उपयोग होणारा नाही. त्यामुळे अशा जमीनीसाठी शासनाने आकारलेली किंमत जास्त असल्याने ती कमी करुन मिळावी म्हणून त्यांनी शासनाकडे विनंती केली होती. परंतु शासनस्तरावर मे. विकास असोसिएट्स यांच्या विनंतीबाबत अद्याप निर्णय घेतला गेलेला नाही.

जमीनीच्या किंमती संदर्भातील प्रतिग्रहिता मे. विकास असोसिएट्स यांच्या विनंतीबाबत शासनस्तरावर अद्याप पर्यंत निर्णय प्रलंबित राहील्याने आतां प्रतिग्रहिता यांनी या संदर्भातील शासन निर्णयाच्या अधीन राहून शासनाने निश्चित केलेल्या प्र.चौ.मी.ला रु.१५,५००/- या तात्पुरत्या दराने येणारी तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम रु.२३,९६,३००/-



Scanned by CamScanner

(रुपये तेवीस लक्ष ब्याहण्णव हजार तीनशे मात्र) डिमांड ड्राफ्टद्वारे या कार्यालयांत अंतरिमरित्या भरणा केली आहे. तसेच खालील अटी मान्य असल्याबाबत त्यांनी रु.१००/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवरील हमीपत्रही सादर केले आहे.

**अटी/शर्ती :-**

१) जमीनीची अंतिम किंमत नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाने निश्चित केल्यानंतर अंतिम किंमत तात्पुरत्या किंमतीपेक्षा जास्त आल्यास दोहोंमधील फरकाची रक्कम विहित व्याजासह भरण्यांस कळविण्यांत येईल त्यावेळी सदर रक्कम विनातक्रार एक महिन्यांत जिल्हाधिकारी यांजकडे भरणा केली जाईल.

२) जमीनीचा विकास करण्यापूर्वी मुंबई महानगरपालिकेकडून योग्य ती परवानगी घेऊन मगच जमीनीचा विकास केला जाईल.

३) प्रतिग्रहिता, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये भोगवटादार वर्ग-२ म्हणून अनन्य संक्राम्य व अविभाज्य धारणा अधिकाराधर जमीन धारण करील.

४) जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६(४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शासनाच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय जमीन किंवा तिचा कोणताही भाग विकण्यांत येणार नाही, गहाण ठेवण्यांत येणार नाही, भाडेपट्ट्याने देण्यांत येणार नाही. हस्तांतरीत करण्यांत येणार नाही किंवा कोणत्याही अन्य प्रकारे संक्रमित करण्यांत येणार नाही.

५) वरील जमीनीचा वापर ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर केली आहे, त्याच प्रयोजनासाठी केला जाईल.

६) वरील अटींचा भंग झाल्यास मंजूर केलेली जमीन प्रतिग्रहितांना कोणताही मोबदला न देता शासन पुनर्ग्रहित करु शकेल.

प्रतिग्रहितांनी जमीनीची तात्पुरती कब्जेहक्काची किंमत भरली असल्याने व वरील अटी/शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र दिले असल्याने उपरोक्त अटी/शर्तींच्या अधीन राहून प्रश्नाधीन जमीन त्यांना मंजूर करण्यांत येत असून जमीनीचा ताबा घेण्यासाठी त्यांनी नगर भूमापन अधिकारी, अंधेरी व तहसिलदार अंधेरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,
मे.विकास असोसिएट्स
विकास सेंटर, २रा मजला,
१०६, एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ (प), मुंबई-४०० ०५४.

3b-c0037-1-mns



Scanned by CamScanner

535



**प्रतिलिपी :-** नगर भूमापन अधिकारी, अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांजकडे रवाना.

२/- त्यांना विनंती करण्यांत येते की, प्रश्नाधीन जमीनीचा ताबा प्रतिग्रहिता यांना देऊन त्याप्रमाणे न.भू.अभिलेखात/गांवच्या अभिलेखात/गांवच्या अभिलेखात योग्य ते फेरफार करुन ताबा पावतीसह व मालमत्ता कार्डाच्या उताऱ्यांसह अहवाल सादर करावा. जमीन दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत सोबत जोडली आहे.

**खाळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे.**

1/11/04

**जिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हाकरीता.**

Recd. 1/11/04

**ISSUED**

1/11/04

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com


539

क्र. :-०१/इब/सी-००३७

दिनांक :- १ /११/२००४.

प्रति,

सहाय्यक संचालक,

नगर रचना, वारस व मूल्य निर्धारण विभाग,

जुने जकात घर, फोर्ट,

मुंबई-४०० ०२३.

विषय :- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा

मौजे अंधेरी येथील नभूक्र.२५५ पैकी क्षेत्र १५४.६चौ.मी. मे. विकास असोसिएटस् यांना मंजूर झालेल्या जमीनीचे मूल्यांकन करण्यांबाबत

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दिनांक ३१/५/१९९३.

या कार्यालयाच्या दिनांक ३१/५/१९९३ च्या पत्रान्वये प्रश्नाधीन जमीनीचे दिनांक १/१/१९८३ व दिनांक १/१/१९९३ नुसार येणारे मूल्यांकन कळविण्यांस आपणांस कळविले होते. परंतु आपला अहवाल अद्याप या कार्यालयांस प्राप्त झालेला नाही.

दरम्यान, शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलईएन-२६८८/प्रक्र.१४२३/ज-३, दिनांक ७/५/१९९७ ने प्रतिग्रहिता मे. विकास असोसिएटस् यांना जमीनीच्या चालू बाजारभावावर आधारीत कब्जेहक्काच्या किंमतीने प्रश्नाधीन जमीन मंजूर करण्यांत आली असून ज्ञापनाची प्रत शासनाने आपणासही पृष्ठांकित केलेली आहे. त्यामुळे शासनाने पारीत केलेल्या ज्ञापनाच्या दिनांकाच्या १ जानेवारी, रोजी असलेले जमीनीचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे. तरी प्रश्नाधीन जमीनीचे १ जानेवारी, १९९७ रोजी नुसार रोजी नुसार असलेले मूल्यांकन सत्वर या कार्यालयांत कळवावे.

संदर्भात नमूद केलेले या कार्यालयाचे दिनांक ३१/५/१९९३ चे पत्र निकाली काढण्यांत यावे.

खाल प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे ISSUED

1/11/04

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हाकरीता.



3h-c0037-mrs

Scanned by CamScanner